# नवी मुंबई महानगरपालिका

**महानगरपालिका सचिव कार्यालय, ८ वा मजला, बेलापूर भवन सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.**

**-: सर्वसाधारण सभेची नोटीस :-** **दिनांक १०/१०/२०१३.**

नवी मुंबई महानगरपालिकेची ऑक्टोबर **महिन्याची सर्वसाधारण सभा, शुक्रवार, दिनांक १८ ऑक्टोंबर २०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता** नवी मुंबई महानगरपालिका, बेलापूर भवन, सी.बी.डी., बेलापूर येथील ७ व्या मजल्यावरील **राजमाता जिजाऊ सभागृह** येथे खालील विषयांवर विचार करण्यासाठी भरेल :-

१. इतिवृत्त कायम करणे.

२. प्रश्नोत्तरे.

**परिवहन समिती मधील ठराव :**

३.जेएनएनयुआरएम अंतर्गत बस खरेदी व अनुषंगिक पायाभूत सुविधा याकरीता निधी उपलब्धतेबाबत.

४.नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या वातानुकूलीत आणि सर्वसाधारण बससेवेच्या सुधारीत तिकीट दराबाबत.

५.नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या सर्वसाधारण बसेसमध्ये अपंगाना प्रवास भाडयात ५०% सवलत देण्याबाबत.

**आयुक्तांकडील प्रस्ताव :**

६.नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात खोदकाम परवानगी देताना आकारावयाच्या शुल्काबाबत.

७.शाखा अभियंता या संवर्गातून उप अभियंता (स्था.व पा.पु.) या संवर्गात पदोन्नती देणेबाबत.

८.नेरुळ, शिरवणे औद्योगिक क्षेत्रातील महात्मा गांधीनगर ते इंडियन ऑईल पर्यंतच्या रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे.

९.कोपरखैरणे विभागातील बोनकोडेगाव येथील साई दर्शन सोसायटी से.१२ ई ते से.९ नाला आणि विनायक नाईक यांच्याघरापासून जयहिंद मेडिकल पर्यंतच्या रस्त्याची डांबरीकरणाने सुधारणा करणे.

१०.कोपरखैरणे विभागातील से. २० मधील रस्त्यांची डांबरीकरणाने सुधारणा करणे.

११.कोपरखैरणे प्र.क्र. २४ येथील टिळक कॉलेज ते महापे ब्रीज पर्यंतच्या रस्त्याच्या दोन्ही बाजुच्या पावसाळी गटार व फुटपाथची सुधारणा करणे व युटिलिटी डक्ट बांधणे.

१२.ऐरोली, सेक्टर ३ येथील नवी मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक रुग्णालयासाठी जोडरस्ता तयार करणे.

१३.मुलुंड ब्रिज ते सेक्टर १५, ऐरोली, दिवा सर्कल पर्यंत मैदानाच्या बाजुला सुशोभिकरण करणे.

१४.ऐरोली, सेक्टर ६, प्रभाग क्र. १७ मधील रस्त्याची सुधारणा करणे.

१५.नेरुळ रेल्वे स्टेशन सेक्टर २१/२८ जवळ लहान वाहतुकीसाठी पुल बांधणे.

१६.ऐरोली येथील 'टी' जंक्शनपासुन ते मुलुंड ब्रिज पर्यंत उर्वरित रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे, कल्व्हर्ट, गटर व फुटपाथ बांधणे.

१७.पामबीच सर्व्हिस रोडलगत मुख्यालयासमोर आर.सी.सी. गटाराची सुधारणा करणे.

१८.तुर्भे, टी.टी.सी. औद्योगिक क्षेत्रातील सविता केमिकल ते महापे जंक्शन पर्यंत रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे.

१९.तुर्भे, टी.टी.सी. औद्योगिक क्षेत्रातील एक्सपांडेड पॉलिमर सिस्टीम प्रा.लि. ते भु. क्र. सी-६८ व भु.क्र. सी-५९ ते सी-५७/१ पर्यंत रस्त्याचे कॉंक्रिटकरण करणे.

२०.नवी मुंबई महानगरपालिका टी.टी.सी. औद्योगिक क्षेत्रातील मुकुंद कंपनी ते महापे शिळरोड पर्यंतच्या रस्त्याचे कॉंक्रिटीकरण (अजंता प्रिंटर्स पर्यंत) (चॅनेज ० ते चॅनेज ३.०४२ कि.मी.) करणे.

२१.वाशी, सेक्टर ८ अ येथे धर्मवीर संभाजी चौक ते होल्डींग पॉडपर्यंत पदपथाचे सुशोभिकरण करणे.(भाग-१)

२२.नेरुळ, शिरवणे औद्योगिक क्षेत्रातील हयुंदाई शोरुम ते बाल्मर लॉरी पर्यंतच्या रस्त्याची कॉंक्रीटीकरणाने सुधारणा करणे.

२३.कोपरखैरणे कार्यक्षेत्रातील नवी मुंबई महानगरपालिका टी.टी.सी. औद्योगिक क्षेत्रातील 'अे' ब्लॉक मधील श्रॉफ पब्लिशर्स प्रा. लि. ते सी-१२७ पर्यंतच्या रस्त्याची डांबरीकरणाने सुधारणा करणे.

२४.कोपरखैरणे कार्यक्षेत्रातील नवी मुंबई महानगरपालिका टी.टी.सी. औद्योगिक क्षेत्रातील 'अे' ब्लॉक मधील मार्शल वॉल पेपर कंपनी ते साईराज रेस्टॉरेन्ट पर्यंतच्या रस्त्याची कॉंक्रिटीकरणाने सुधारणा करणे.

२५.पावणेगांव येथील स्मशानभुमीचे नुतनीकरण करणे.भाग-२

२६.कोपरखैरणे कार्यक्षेत्रातील नवी मुंबई महानगरपालिका टी.टी.सी. औद्योगिक क्षेत्रातील 'अे' ब्लॉक मधील फायर स्टेशन ते यश हॉटेल पर्यंतच्या रस्त्याची कॉंक्रिटीकरणाने सुधारणा करणे.

२७.घणसोली कार्यक्षेत्रातील नवी मुंबई महानगरपालिका टी.टी.सी औद्योगिक क्षेत्रातील 'आर' ब्लॉकमधील एम.टी.एन.एल. ऑफिस ते ब्राइटेक्स इंजिनियरींग वर्क पर्यंतच्या रस्त्याची कॉंक्रिटीकरणाने सुधारणा करणे.

२८.वाशी, सेक्टर ९ अ येथे शिवाजी चौक ते सलमान सोसायटीपर्यंत पदपथाचे सुशोभिकरण करणे. भाग -२

२९.तुर्भे स्टेशनजवळील नाल्याची सुधारणा करणे.

३०.नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण मंडळावर क्रीडा अधिकारी या संवर्गातील एक पद निर्माण करणे व त्यावर श्रीम. अभिलाषा म्हात्रे यांची सदर पदावर नेमणूक करणे.

**ठरावाच्या सूचना :**

**३१. सौ. सिंधु अरविंद नाईक, यांजकडून :-**

प्र. क्र. ५०, वाशी, सेक्टर -१५ येथे जेष्ठ नागरिकांकरीता निवारा केंद्र उभारणेबाबत महानगरपालिकेच्या प्रत्येक प्रभागातील जेष्ठ नागरीक निवारा केंद्र या धोरणानुसार बी-२ टाईप मधील विकास क्रिडा मंडळासमोरील जागेत असे निवारा केंद्र बांधणे.

**३२ ते ३४. सौ. शुभांगी सर्जेराव सकपाळ, यांजकडून :-**

(३२) प्र.क्र. ३५, कोपरखैरणे, सेक्टर -१४ मधील गार्डनचे कारंजे नादुरुस्त झाले आहे ते काढून जेष्ठ नागरिकांना बसण्यासाठी मोठे गजेबो बनविणे. (३३) प्र. क्र. ३५, कोपरखैरणे, सेक्टर - २२, २३ मधील गार्डनचे गेट तुटलेल्या अवस्थेत आहे ते मोठे डिझायनर गेट बसविणे. (३४) प्र. क्र. ३५, कोपरखैरणे, सेक्टर - १४ निसर्ग उदयान टप्पा-१ मधील पाथवेची सुधारणा करण्यात यावी. त्याचप्रमाणे तेथील आसन व्यवस्था सुधारणे.

**३५. सौ. सरोज रोहिदास पाटील, यांजकडून :-**

प्र.क्र. ८१ मधील से.२९ आग्रोळी येथील भुखंड क्र.F१ व F२ च्या समोरील जागेवर मैदानासाठी असलेला भुखंड क्षेत्रफळ सुमारे ५०० ते ७०० चौ.मी. असुन हा भुखंड अगदीच लहान आहे. गावातील सार्वजनिक उत्सव, सांस्कृतिक कार्यक्रम, लग्न समारंभ तसेच मैदानी खेळ भरविणे ही सामाजिक गरज आहे. त्यामुळे सदरचा मैदानासाठी असलेल्या भुखंडाऐवजी बाजुलाच असलेल्या से.३० व ३१ मध्ये सिडकोने भुखंड क्र.१४ हा मैदानासाठी ठेवलेला आहे. सदर भुखंड आकाराने मोठा व मैदानी खेळ व सांस्कृतीक कार्यक्रमासाठी योग्य असल्याने भुखंड क्र.१४ से. ३०/३१ हा भुखंड पालिकेने हस्तांतरीत करुन घेवून ग्रामस्थांना आणि येथील नागरिकांना मैदान उपलब्ध करुन देणे.

**३६ ते ३८. सौ. लता पुष्पराज कोटकर, यांजकडून :-**
(३६) प्र. क्र. ९ मधील ऐरोली गावात पाण्याची टाकी बांधणे.
(३७) प्र. क्र. ९ मधील ऐरोली गाव, साईनाथवाडी, विटभट्टी मधील गटार बांधणे. (३८) प्र. क्र. ९ मधील ऐरोली गावात (ऐरोली कोळीवाडा) असे तीन ठिकाणी कमाणी लावणे.

**३९ ते ४१. श्री. काशिनाथ जनार्दन पाटील, यांजकडून :-**
(३९) जुईनगर सेक्टर २२ च्या पाठीमागे १५ मीटर रस्त्यामधुन मल:निस्सारण वाहिनी टाकण्यात आली त्या ठिकाणावरील मातीचे ढीग उचलून रस्ता पूर्ववत करणे. (४०) पारसिक हिल वरील सायन-पनवेल हायवेच्या कडेला खांडोरी मातेच्या मंदिराकडे जाणारा रस्ता पूर्ववत करणे. (४१) महाराष्ट्र शासनातर्फे स्वस्त भाजी केंद्र देण्यात येते त्या करीता नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील प्रत्येक प्रभागामध्ये राखीव भूखंड (ओटले) ठेवणे.

**४२ ते ४४. श्री. विजयानंद शंकर माने, यांजकडून :-**
(४२) प्र. क्र. ३०, से.६ मधील देवीच्या मैदानात पेव्हर ब्लॉक बसविणे. (४३)महानगरपालिकेच्या वार्ड ऑफिसच्या आवारातील सुधारणा करण्यात यावी व पदपथ पेव्हर ब्लॉक लावण्यात यावेत. तसेच संरक्षक भिंतीची उंची वाढवुन तीन गेटची सुधारणा करण्यात यावी. सेक्टर ३ व ६ मधील मार्केटची सुधारणा त्वरीत करणे. (४४) प्र. क्र.३०, से.६ मध्ये मिनीमार्केट पुर्णपणे नादुरुस्त अवस्थेत आहे. मिनी मार्केटच्या इमारतीच्या आवारात पेव्हर ब्लॉक बसवून सुशोभित करण्यात यावे व तसेच संरक्षक भिंतीची उंची वाढवून गेटची सुधारणा करणे.

**४५ ते ४७. सौ. मोनिका लक्ष्मीकांत पाटील, यांजकडून :-**
(४५) प्र. क्र. २१ तळवली नाका अंतर्गत पाण्याची पाईपलाईन, गटारे व भुमिगत विद्युत वाहिन्यांची कामे झाल्यामुळे येथील पदपथांची अवस्था बिकट झालेली आहे. त्यामुळे नागरिकांना पदपथावरुन चालणे जिकरीचे झालेले आहे. तरी संपूर्ण प्रभागामधील पदपथांची सुधारणा करुन त्यावर इंटरलॉकिंग पेव्हर ब्लॉक बसविणे. (४६) प्र. क्र. २१ अंतर्गत नव्याने विकसित केलेला सेक्टर-२१ मधील भुखंड क्रमांक १ हा शाळेच्या मैदानासाठी आरक्षित केलेला आहे. तरी सदरचा भुखंड लवकरात लवकर महापालिकेकडे हस्तांतरीत करुन वापरासाठी तयार करणे. (४७) प्र. क्र. २१ सेक्टर-२१ मधील भुखंड क्रमांक २ हा शाळेसाठी राखीव भुखंड आहे. तो लवकरात लवकर हस्तांतरीत करुन त्याठिकाणी मराठी व इंग्रजी माध्यमाची शाळा बांधणे.

**(४८) श्री. विठ्ठल बाजीराव मोरे, यांजकडून :-**
सरकारचे जेष्ठ नागरिक धोरण नुकतेच जाहीर झालेले आहे. त्या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये प्रत्येक नोडमध्ये किमान १ वृध्दाश्रम असावा अशी सुचना मी या प्रस्तावाद्वारे करित आहे. सद्य:स्थितीत एकुण लोकसंख्येच्या ९% लोक हे जेष्ठ नागरिक असल्याचे जनगणनेनुसार दिसुन आलेले आहे. समाजामध्ये निरनिराळ्या आर्थिक स्थरांवर दिवसेंदिवस वाढणारी जेष्ठ नागरिकांची संख्या आणि त्यासाठी सद्य:स्थितीत उपलब्ध असलेली व्यवस्था ही अपुरी असल्याने नवी मुंबईतील प्रत्येक नोडमध्ये एक वृध्दाश्रम निर्माण केल्याने वृध्दमंडळीना त्या त्या भागात सोईचे होईल व शासनाच्या धोरणाला महापालिकेने प्रतिसाद दिल्याचे श्रेय मिळेल.

**४९ ते ५१. सौ. राधा भुवन ठाकुर, यांजकडून :-**
(४९) प्र. क्र.८५, दिवाळे येथील आंगणवाडी येथील मैदान व संरक्षण भित बांधणे. (५०) प्र. क्र. ८५, दिवाळेगांव येथील व्यायामशाळा व वाचनालय बांधणे. (५१) प्र. क्र. ८५, फणसपाडा येथील गांवदेवी मंदिराला संरक्षण भित व इंन्टरलॉक बसविणे.

**५२ ते ५४. श्री. सुरेश गोपाळ शेट्टी, यांजकडून :-**
(५२) प्र. क्र.७१, सेक्टर ३, नेरुळ, नवी मुंबई येथील मोकळा भुखंड क्र.७अे असून सदर मोकळया भूखंडावर गेली २७ वर्षापासून विभागातील जनतेच्या माध्यमातून सामाजिक उपक्रमाद्धारे सांस्कृतिक कार्यक्रम साजरा करण्यात येत असून सदर भूखंड सांस्कृतिक कार्यक्रमाकरिता कायमस्वरुपी आरक्षित करणे.
(५३) प्र. क्र.७१, सेक्टर ३, नेरुळ , नवी मुंबई येथील स्टेशन रोड एम.एस.ई.बी. सेक्टर ११ ते नेरुळ केमिस्ट सेक्टर ११ पर्यंत फुटपाथवरील पथापथावर पेव्हरब्लॉक बसवून सुशोभित करणे.
(५४) प्र. क्र.७१, सेक्टर ३, नेरुळ , नवी मुंबई येथील गिलगिरी गार्डन मध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र बांधून देणे.

**५५ व ५६. सौ. नेत्रा आशिष शिर्के, यांजकडून :-**
(५५) प्र. क्र. ७३, सेक्टर १७, लेन नं. १ येथे शेडच्या स्वरुपात असलेल्या वाचनालयाचे तळमजला व पहिला मजला (Ground+१) अशा स्वरुपात पुर्नबांधणी करणे. (५६) प्र. क्र. ७३, सेक्टर १९, कल्पना चावला उद्यान व गुरुनानक उद्यान मधील लहान मुलांसाठी असलेल्या नादुरुस्त खेळणी बदलून नवीन खेळणी लावण्यात यावे व उद्यानातील सर्व बाक (बेंचेस) बदलून नवीन लावणे.

**५७ ते ५९. सौ. कोमल सोमनाथ वास्कर, यांजकडून :-**
(५७) नवी मुंबई हे २१ व्या सुनियोजीत विकसीत शहर आहे. सदर शहराच्या सौंदर्याचे चित्रीकरण करण्यासाठी देश विदेशातुन पर्यटक येत असतात. तसेच कृषी उत्पन्न बाजार समिती, कोकण भवन, सिडको भवन तसेच बहुतांशी शासकीय कार्यालय नवी मुंबईतच असल्यामुळे कामा निमित्त हजारो प्रवाशी दररोज नवी मुंबईत ये जा करीत असतात. रात्री अपरात्री बसथांब्यावर नाक्यावर रेल्वे स्टेशनवर ताटकलत बसतात. खाद्यपदार्थांची सोय नसल्यामुळे उपासमारीने रात्र काढत असतात. अशा प्रवाशांची गैरसोय होऊ नये त्यासाठी नवी मुंबईत अशा सर्व मोक्याच्या ठिकाणी रात्रभर रेस्टॉरंट सुरु असणे ही गरज आहे. तरी नवी मुंबईतही हॉटेलधारकांना रात्रभर रेस्टॉरंट सुरु ठेवण्याची परवानगी देणे. (५८) नवी मुंबईत बेरोजगार तरुणांच्या संख्येत दिवसागणीक झपाटयाने वाढ होत आहे. हाताला काम नसल्यामुळे सदर तरुण वर्ग वाममार्गाला जाण्याची दाट शक्यता आहे. त्यांच्या उदरनिर्वाहासाठी प्रशासनाने काही योजना हाती घेऊन ठोस पाऊले उचलायला हवीत. शिवसेना पक्षाची महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थेत ज्या ज्या ठिकाणी सत्ता आहे त्या त्या ठिकाणी शिव वडापाव सेंटरच्या माध्यमातुन हजारो तरुणांना रोजगार मिळवुन देण्यात यश प्राप्त केले आहे. त्याच धर्तीवर नवी मुंबईतही याची अंमलबजावणी करुन नवी मुंबईतील तरुण बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करुन देणे. (५९) सानपाडा विभागाचा झपाटयाने विकास होत असताना या ठिकाणी एका गोष्टीची उणीव कायम भासत असते ती म्हणजे तलाव. ज्यावेळी सिडकोने या विभागाचा विकास केला त्यावेळी सदर प्राधिकरणाने सानपाडा विभागात तलाव उभारणे क्रमप्राप्त होते परंतु त्यांनी तसे न केल्यामुळे फार मोठी गैरसोय होत आहे. गणेश विसर्जन सोहळा असो वा देवी विसर्जन सोहळा साधारणत: दोन ते तीन किलो मीटर पर्यंत रहिवाशीयांना जावे लागते. तरी सानपाडा अंडरपास जवळील श्री दत्त मंदिरासमोरील रेल्वे पटरीलगत असलेल्या मोकळया भुखंडावर सानपाडा विभागातील रहिवाशीयांच्या मुर्ती विसर्जनासाठी कृत्रीम तलाव बांधणे.

**६०. श्री. सुरज बाळाराम पाटील, यांजकडून :-**
नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात उपलब्ध माहितीनुसार मालमत्ता विभागाच्यावतीने पावसामुळे मैदानामध्ये वाढलेले गवत साफसफाई करीता निविदा काढुनही त्यास योग्य प्रतिसाद मिळत नसल्याने सदरची कामे प्रलंबित राहून जातात. त्यामुळे मैदानाची दुरावस्था पहावयास भेटते. ज्यामुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागतो. म्हणून सदरच्या कामासाठी गवत कापणारी मशीन खरेदी करुन विभागावार उपलब्ध असलेल्या कर्मचा-याकडून त्याची साफसफाई करणे.

**६१ ते ६३. श्री. चंद्रकांत रामदास पाटील, यांजकडून :-**
(६१) प्र. क्र. २२ मधील संभाजीनगर, महापे, एम.आय.डी.सी क्वॉरी विभाग येथे ४ फिरते शौचालयाची व्यवस्था करणे. (६२) प्र. क्र. २२ मधील सुलाई देवी वारलीपाडा रबाले येथे पिण्याच्या पाण्याची सोय त्वरीत करणे. (६३) प्र. क्र.२२ मधील सभाजी नगर येथे शाळेचे शेड बांधणे.

**मा. महापौरांच्या आदेशावरुन,**

**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
**महानगरपालिका सचिव (प्र.),**
**नवी मुंबई महानगरपालिका.**

**महापालिका सचिव कार्यालय,**
**नवी मुंबई महानगरपालिका,**
**दिनांक १० ऑक्टोबर २०१३.**